**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1083/2007.**

श्री राजेंद्र मुखरु अलोने
रा. तारेगाव (खुर्द) पो. मोर्शी
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप विभागीय पोलीस अधिकारी ब्रम्हपूरी
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
ठाणेदार पोलीस स्टेशन ब्रम्हपूरी
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.12.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे सादर केलेले आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.12.2005 रोजी (1) संजय राऊत (2) वामन तलमले (3) रामदास तलमले (4) महादेव दोनाडकर (5) मधुकर नैताम (6) रजनी गजभिये

(7) प्रल्हाद गजभिये (8) ईश्वर निखारे (9) भजन खोब्रागडे (10) मदन दिघोरे (11) गोविंदा शिवरकर (12) मंगलदास रामटेके (13) नवनाथ राऊत (14) मोरेश्वर उईके (15) अशोक माटे (16) रामा दोडके (17) भाउराव मोटघरे (18) दिपक पराते (19) सुर्यकांत खरकाडे (20) गणपत राउत (21) आनंद शिवरकर (22) रमेश जांभूळकर (23) रमेश भर्रे (24) मुखरु अलोने (25) राजेंद्र अलोने (26) आनंदा अलोने (27) शामराव देशमुख (28) शालीक अलोने (29) अन्नपुर्णा अलोने मयत दिलीप मुखरु अलोने यांच्या मृताच्या चौकशी संबंधाने बयानाच्या प्रती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांना संजय राऊत वगळून अन्य व्यक्तींच्या बयानाच्या प्रती दि. 15. 12.2005 रोजी पुरवण्यात आल्या व तसे अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जावर पोच दिलेली दिसून येते. परंतु संजय राऊत यांच्या बयानाची प्रत अजून पर्यंत प्राप्त न झाल्यामुळे दि. 20.10.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 3.11.2006 रोजी संजय राऊत यांचे बयान नोंदणी केलेली नसल्यामुळे पुरवता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे पुन्हा अपीलकर्ता यांनी दि. 15.11.2006 रोजी मयत दिलीप मुखरु अलोने यांच्या चौकशी संबंधाची संपूर्ण माहिती तसेच केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण अहवाल मिळणेसंबंधाने पुन्हा माहिती अधिकारी म्हणून ठाणेदार यांचेकडे अर्ज केलेला दिसून येतो व माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. त्यास दिनांक 28.11.2006 रोजी माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन ब्रम्हपूरी यांनी उत्तर दिलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी ब्रम्हपूरी यांनी खुलासा दाखल करतांना दि. 1.11.2006 रोजी मृतक दिलीप मुखरु अलोने यांचे मृताचे चौकशी संबंधाने श्री संजय राऊत यांचे बयान घेण्यात आले नाही त्यामुळे त्या बयानाची प्रत पुरवता येत नाही असे दि. 3.11.2006 रोजी रजिस्टर पोस्टानी कळविण्यात आले असे नमूद केले

आहे. सदरची प्रत त्यांना दि. 6.11.2006 रोजी प्राप्त झालेली आहे. पोस्टाची पोच पावतीची छायांकीत प्रत सोबत जोडलेली आहे. त्यानंतर दि. 12.6.2007 रोजी अपील सादर केले. त्याअनुषंगाने त्यांनी मृतक अलोने यांच्या चौकशी संबंधाने मागितलेली माहिती त्यांना दि. 26.6.2007 रोजी त्याच दिवशी व्यक्तिशः पुरवण्यात आलेली प्रत मिळाल्याबाबत त्यांच्या दुय्यम प्रतीवर दिनांकासह स्वाक्षरी घेण्यात आली आहे. छायांकीत प्रत सोबत जोडली आहे. त्यामुळे अर्जदार श्री राजेंद्र मुखरु अलोने यांनी माहितीच्या अधिकारान्वये मागितलेली माहिती त्यांना मुदतीच्या आत पुरविण्यात आलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती ही मुदतीत पुरविण्यात आलेली आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोसोबत जे स्पष्टिकरणवजा खुलासा दिलेला आहे त्यामध्ये माहितीच्या अधिकारात माहितीच्या अर्जाच्या संबंधाने वर नमूद केल्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली असे नमूद केले असले तरी संजय राऊत यांच्या संदर्भात बयाण उपलब्ध करुन दिले नाही अशी तक्रार केलेली दिसून येते. अर्थातच संजय राऊत यांचे बयाण नोंदवून घ्यायचे किंवा नाही हा पोलीस तपासाचा भाग आहे व त्यामुळे त्याबाबत कोणत्याही प्रकारचे आदेश देणे आयोगाच्या अधिकार कक्षेत येत नाही. यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती मिळालेली आहे त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात वेळोवेळी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 20.2.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

क्रमांक रामाआ/प्रकरण शास्ती/ /08

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय

दिनांक / /2008

विषय :– राज्य माहिती आयोग नागपूर येथील झालेल्या सुनावणीस अनुसरुन लादण्यात आलेल्या शास्तीबाबतचा अनुपालन अहवाल सादर करणे.

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये नागपूर व अमरावती विभागातील विविध अपीलांची सुनावणी मा. राज्य माहिती आयुक्त यांचे समोर जानेवारी 2007 ते डिसेंबर 2007 या दरम्यान झाली. सदर सुनावणीस आपल्या विभागातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. या सुनावणीमध्ये समोर आलेल्या तथ्यांचा विचार करुन वेगवेगळया प्रकरणी संबंधित माहिती अधिका–यांवर शास्ती लादण्यात आलेली आहे. तसेच या संदर्भातील आदेशांच्या प्रतीही संबंधित अधिका–यांना यापूर्वीच पुरविण्यात आलेल्या आहेत. आपल्या कार्यालयाशी संबंधित शास्तीबाबतचे विवरणपत्र सोबत जोडले आहे. कृपया पाहावे.

ज्या ज्या प्रकरणी शास्ती लादण्यात आलेली आहे त्याबाबतचा अनुपालन अहवाल अद्यापही राज्य माहिती आयोगास प्राप्त झालेला नाही. करीता सदर प्रकरणी तातडीने कार्यवाही करुन राज्य माहिती आयोगास शास्तीच्या रकमेच्या चालानच्या प्रमाणीत प्रतीसह अनुपालन अहवाल 10 दिवसात सादर करावा.

(वि. सु. बर्डेकर)

उपसचिव

राज्य माहिती आयोग नागपूर

प्रति,

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1081/2007.**

श्री रमनलाल चोपलाल राणे

मु. खुर्शिपार पो. चिरचाळबांध

ता. आमगाव जिल्हा गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्हि. एन. कुंभारे

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

तालुका कृषी अधिकारी,

कार्यालय आमगाव ता. आमगाव जिल्हा गोंदिया

2) श्री के. सी. पालेवार

जन माहिती अधिकारी तथा

कृषी पर्यवेक्षक

तालुका कृषी अधिकारी कार्यालय आमगाव

ता. आमगाव जिल्हा गोंदिया ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.12.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.9.2006 रोजी राष्ट्रीय विकास योजने अंतर्गत कृषी विभागा अंतर्गत राबविण्यात येणा—या विविध योजना, राष्ट्रीय समविकास योजना, राष्ट्रीय तनविकास, तृनधान्य योजना, शेतक—यांना 2003 ते 2006 पर्यंत देण्यात आलेले विविध अनुदान, औषध व इतर वस्तू, प्रशिक्षण खर्च, प्रशिक्षणाला येणा—या शेतक—यांची पत्त्यासहीत यादी, शासनाकडुन चालविण्यात येणारे कृषि वाचनालयाची यादी, विभागाअंतर्गत राहणारे शासकीय कर्मचारी यांची यादी. अशी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 13.9.2006 रोजी जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्र. 533 दि. 13.9.2006 रोजी अर्जदारास माहिती मिळणेबाबत माहितीच्या खर्चाच्या संदर्भात एकुण 475 पृष्ठांचा खर्च रु. 950/— इतकी रक्कम चालानाद्वारे भरुन त्याची मुळ प्रत या कार्यालयास सादर करावी नंतरच आपणास माहिती देण्यात येईल. मुळ प्रतीवर तालुका कृषि अधिकारी यांची सही दिसून येते. सदरचे पत्र पाठविल्याच्या संदर्भामध्ये का. न. चार—सर्वसाधारण फाईल नोंदवही मध्ये दि. 13.9.2006 च्या पुढे रमनलाल चोपलाल राणे खुर्शिपार जिल्हा गोंदिया या पत्त्यावर रु. 5/— पोस्टाचा तिकिट लावल्याचा खर्च दाखवण्यात आलेला आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी खर्च भरण्याकरीता कळविण्यात आलेली आहे असे दिसून येत असले तरी अपीलकर्ता यांना सदरचे पत्र मिळालेले आहे याबाबतचा उल्लेख त्यांनी प्रथम अपीलातसुध्दा केलेला नाही किंवा द्वितीय अपीलातसुध्दा केलेला नाही मात्र विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 8.10.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्यामध्ये सुध्दा खर्चाच्या भरण्याच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे आक्षेप किंवा तक्रार केलेली दिसून येत नाही. वास्तविक प्रथम अपील दाखल केल्या नंतर त्याबाबतची सुनावणी घेवून खर्चाच्या भरण्याच्या संदर्भामध्ये निर्णय देणे योग्य झाले असते. परंतु खर्चाचा भरणा केला नाही म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही हे म्हणणे अधिनियमाच्या तरतुदीशी सुसंगत नाही. प्रथम अपील दाखल झाल्यावर नैसर्गिक न्यायाच्या तत्वाप्रमाणे दोनही पक्षकारांच्या उपस्थितीत सुनावणी घेवून माहिती उपलब्ध करुन देता येईल अशा प्रकारे निर्णय व्हावयास पाहिजे होता तसे कोणत्याही प्रकारे

प्रथम अपीलाच्या संदर्भात केलेला दिसून येत नाही व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते व त्याबद्यल त्यांना ताकीद देणे आवश्यक आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात सुनावणी घेवून निर्णय देण्याच्या संदर्भामध्ये जिल्हा कृषि अधिक्षक यांनी योग्य तो निर्णय घेणे आवश्यक राहिल. आज अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे व तालुका कृषि अधिकारी यांनी दि. 13.9.2006 रोजी खर्च भरण्यासाठी जे पत्र पाठविलेले आहे ते गृहीत धरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना पुन्हा खर्चाचा भरणा करण्या संदर्भात निर्णय देणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांच्या दि. 2.9.2006 च्या अर्जास दि. 13.9.2006 रोजी तालुका कृषि अधिकारी यांनी कळविलेल्या खर्चाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत सुनावणी करुन प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात यावा.
2) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हा कृषि अधिकारी, गोंदिया यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 20.2.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1084/2007.**

श्री संजय विजय भिडे
1111, उत्तर शिवाजी नगर,
गणपती गॅस गोडवून जवळ, सांगली
ता. जि. सांगली – 416 416 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जी. बी. इंदुरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रभारी विक्रीकर सह आयुक्त (प्रशा)
नागपूर विभाग नागपूर
2) श्री डी. एस. वाघमारे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. विक्रीकर आयुक्त
नागपूर विभाग नागपूर. ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.12.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.7.2006 रोजी आर्थिक वर्ष सन 1996–97 पासून आर्थिक वर्ष सन 2005–2006 पर्यंतच्या कालावधीत ''नागपूर महानगर पालिका'' क्षेत्रातील म्हणजेच हद्यीतून प्रत्येक आर्थिक वर्षाप्रमाणे ''व्यवसाय कर'' यांचे प्रत्यक्ष किती उत्पन्न मिळाले ''व्यवसाय कर'' याचे प्रत्यक्ष उत्पन्न प्रत्येक आर्थिक वर्षाप्रमाणे वेगवेगळे दाखवावे. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.8.2006 रोजी माहिती अधिकारी (स्विय सहा.) विक्रीकर सह आयुक्त (प्रशा.) नागपूर विभाग नागपूर यांनी ''नागपूर महानगर पालिका क्षेत्राची व्यवसाय कराची महसूल जमेची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही त्यामुळे नागपूर जिल्हयात व्यवसाय कराअंतर्गत जमा होणा–या महसुलाची माहिती खालीलप्रमाणे पुरविण्यात येत आहे.'' ती सन 1996–97 ते सन 2005–2006 पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली असून सदरची माहिती दि. 24.8.2006 रोजी मिळाली असे अपीलकर्ता यांनी पोच दिली आहे. परंतु सादरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 19.9.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले असून प्रथम अपीलामध्ये कोल्हापूर महानगर पालिका, औरंगाबाद महानगर पालिका, जळगाव महानगर पालिका व मालेगाव महानगर पालिका क्षेत्रातील म्हणजेच हद्यीतील प्रत्येक आर्थिक वर्षाप्रमाणे ''व्यवसाय कर'' यांचे प्रत्यक्ष उत्पन्नाची माहिती उपलब्ध होवू शकते म्हणजेच मिळू शकते तर मग ''नागपूर महानगर पालिका'' क्षेत्रातील म्हणजेच हद्यीतील प्रत्येक आर्थिक वर्षाप्रमाणे ''व्यवसाय कर'' यांचे प्रत्यक्ष उत्पन्नाची माहिती का उपलब्ध होवू शकत नाही म्हणजेच मिळू शकत नाही व त्याकरीता अपील मेमोसोबत एक्झिबिट नं. 04, 05, 06 व 07 हे पाहावे व वरील 1 व 2 चा विचार करुन दि. 17.1. 2006 च्या जोडपत्र ''अ'' मध्ये अर्जात मागितलेली माहिती कलम 7 चे पोट कलम 6 अन्वये विनामुल्य म्हणजेच मोफत मिळावी अशी विनंती केलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19.10.2006 रोजी देण्यात आलेला असून ''माहितीचा अधिकार

अधिनियम 2005 नुसार आपण विचारलेली माहिती माहिती अधिकारी नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक 3242 दि. 16.8.2006 रोजी आपणास पुरविलेली आहे तसेच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात पुरविण्याची तरतूद आहे व अस्तित्वात असलेल्या माहिती वरुन नविन माहिती निर्माण करुन आपणास पुरविण्याची तरतुद माहितीच्या अधिकार कायद्यात नाही. त्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्र. 3909 दि. 30.9.2006 नुसार कळविल्याप्रमाणे व्यवसाय कर जमा महसुलाची नोंद पूर्वीपासूनच संपूर्ण जिल्हयाकरीता होत असल्याने त्याचे महानगर पालिका निहाय व तालुका निहाय महसुल जमा वर्गिकरण उपलब्ध नाही. त्यामुळे सदर माहिती पुरविण्यास हे कार्यालय असमर्थ आहे अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त (प्रशा) नागपूर विभाग नागपूर यांनी कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन सदरच्या द्वितीय अपीलामध्ये पुन्हा इतर महानगर पालिकेच्या क्षेत्रातील माहिती उपलब्ध करुन दिली जाते मात्र नागपूर महानगर पालिकेच्या क्षेत्रातील माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही याकरीता दि. 27.6.2006 च्या जोडपत्रातील अर्जात मागितलेली माहिती मिळावी तसेच ते कलम 7 चे पोट कलम 6 अन्वये मोफत मिळावी व राज्य जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 20 चे पोट–कलम (1) अन्वये शास्ती लादण्यात यावी अशी विनंती केलेली दिसून येते. नुकसान भरपाई मिळावी असे नमूद केलेले आहे याबाबतचा सविस्तर व तपशिलवार अर्ज प्रत्यक्ष चौकशीचे वेळेस दाखल करुन तसेच अपीलकर्ता हे आज विनाअनुमती किंवा कोणत्याही प्रकारचा पुन्हा तपशिल दाखल न करता गैरहजर आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 27.7.2006 रोजी माहिती मिळणेसाठी जो अर्ज केलेला आहे व त्या संदर्भाची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये स्पष्टपणे नागपूर महानगर पालिकेच्या क्षेत्राची व्यवसायकराची महसुल जमेची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही

त्यामुळे नागपूर जिल्हयातील व्यवसायकरा अंतर्गत जमा होणा–या महसुलाची खालील प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलाच्या समर्थनार्थ अपीलकर्ता यांनी इतर महानगर पालिका क्षेत्रामधून अशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हे पुरावे दाखल केलेले आहेत. असे असले तरी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नागपूर महानगर पालिकेच्या क्षेत्रातील तशा प्रकारची माहिती उपलब्ध नाही व त्याकरीता जे कारण दिलेले आहे त्या कारणांचा विचार केल्यास माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचा विचार करणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे कलम 2 मधील (च) व (ग) यातील अनुक्रमे ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या दोन संज्ञांच्या संदर्भात विचार करावा लागतो. ''माहिती'' याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ईमेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविधा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही ईलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामुग्री यांचा समावेश होतो. ''माहितीचा अधिकार'' याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवत्या येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार असा आहे आणि त्यात (एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहाणी करणे (दोन) दस्तऐवज किंवा अभिलेखाच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रति घेणे (तीन) सामुग्रीचे प्रमाणीत प्रति घेणे (चार) ईलेक्ट्रॉनिक प्रकारातील साठवलेली असेल त्याबाबत मुद्रीत प्रती मार्फत माहिती मिळवणे याबाबतच्या अधिकारांचा समावेश होतो. या दोन्ही व्याख्येंमध्ये अभिलेखाचा उल्लेख केलेला आहे. व अभिलेख या संज्ञेच्या व्याख्येत (क) कोणतेही दस्तऐवज, हस्तलिखीत व फाईल, एखाद्या दस्तऐवजाचा कोणताही सुक्ष्मपट इत्यादी (ग) अशा सुक्ष्मपटात संग्रहीत केलेल्या प्रतिमांची नक्कल (घ) संगणकाद्वारे किंवा कोणत्याही अन्य उपकरणाद्वारे तयार केलेले कोणतेही अन्य साहित्य यांचा समावेश होतो. या

व्याख्येंवरुन असे दिसून येते की कोणत्याही प्रकारे नविन माहिती तयार करुन देणे हे अपेक्षीत दिसून येत नाही. माहिती ज्या साहित्याच्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या साहित्यात म्हणजेच अभिलेख, दस्वऐवज यांच्याच छायांकित प्रति उपलब्ध करुन देणे असाच होतो व त्यामुळे नागपूर विक्रीकर कार्यालयामध्ये जर नागपूर महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका क्षेत्र वगळून जिल्हयातील इतर क्षेत्र अशा प्रकारची माहिती उपलब्ध नाही व जिल्हयाची एकत्रित माहिती उपलब्ध असल्यामुळे स्वतंत्रपणे नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास ती नव्याने तयार करुन द्यावी लागेल व तसे तर अधिनियमामध्ये नाही हा प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य वाटतो. परंतु असे असले तरी अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या समर्थनार्थ म्हणजे इतर महानगरपालिकेच्या क्षेत्रामधून अशा प्रकारची माहिती प्रत्यक्ष उपलब्ध करुन दिलेली आहे यामुळे महाराष्ट्रा करीता एकच विक्रीकर कार्यालय असल्यामुळे वेगवेगळया क्षेत्रीय विक्रीकर कार्यालयांमधून माहितीचे अभिलेख किंवा कार्यपध्दती किंवा दस्तऐवज विविध प्रवर्गातील विवरण ठेवण्याची पध्दत ही वेगवेगळी आहे काय अशी शंका निर्माण होते. त्याबाबतीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सहा. आयुक्त नागपूर हे अजुनही ठाम आहेत. व त्यांच्याच म्हणण्यानुसार राज्यातील कोणत्याही विक्रीकर कार्यालयांमध्ये नागपूर महानगरपालिका निहाय व्यवसाय कराच्या संदर्भामध्ये माहिती ठेवण्याची पध्दत नाही. या त्यांच्या मुद्यांच्या संदर्भात डॉ. गो. श. काळे अपीलीय अधिकारी विक्रीकर सहा. आयुक्त नाशिक यांचे दि. 12.10.2006 चा निर्णय जरी विचारात घेतला तरी सदरचे अपीलसुध्दा शासकीय माहिती अधिकारी यांनी पत्र क्र. नावी/विसआ/पशा 3/माअ/2006/ब 4063 नाशिक दि. 21.8.2006 नुसार नाशिक जिल्हयाची व्यवसायकराची माहिती कळविली होती असे दिसून येते. त्याविरुध्द होते असे दिसून येते. यावरुन असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही की नाशिक क्षेत्रात सुध्दा जिल्हयाची व्यवसायकराची माहिती उपलब्ध होती व त्यामुळे तशा प्रकारे त्यावेळेस सुध्दा

तत्कालीन माहिती अधिकारी यांनी ती कळविलेली दिसून येते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील मान्य करुन नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील व्यवसायकर जमा महसुल उत्पन्नाबाबत माहिती देण्यात यावी असा आदेश दिलेला असल्यामुळेच अपीलकर्ता यास तशा प्रकारची स्वतंत्रपणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. याचाच अर्थ सदरची माहिती संपूर्ण जिल्हयाच्या माध्यामातून नव्याने काढून देण्यात आलेली दिसते परंतु उत्तरवादी यांचे म्हणण्याप्रमाणे अशी नव्याने काढून मिळालेल्या माहितीची शहानिशा (पडताळणे) कशावरुन व कशी करावी हा प्रश्न अनुत्तरीत राहातो कारण ती बरोबर आहे किंवा कसे याचे प्रमाणित करुन देणे हे अडचणीचे होवू शकते. व हे प्रथम अपीलीय अधिकारी प्रभारी विक्रीकर सह आयुक्त (प्रशा) नागपूर यांच्या दिलेल्या निर्णयाप्रमाणे नाही तसेच वर विवेचन केलेल्या ''माहिती, माहितीचा अधिकार व अभिलेख'' या संज्ञांच्या प्रमाणेसुध्दा अपेक्षीत दिसून येत नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी प्रभारी विक्रीकर सह आयुक्त (प्रशा) नागपूर विभाग नागपूर यांनी दिलेला निर्णय हा योग्य असल्याचा निष्कर्ष काढणे आवश्यक ठरते त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. इतर महानगरपालिका कार्यालयांमधून जी माहिती नव्याने तयार करुन देण्यात आली असल्यास त्याबद्यल विक्रीकर आयुक्त यांनी दखल घेवून संपूर्ण राज्याकरीता अभिलेख ठेवण्याच्या संदर्भात किंवा दस्तऐवजाचे वर्गीकरण करण्याच्या संदर्भात एकच समान कार्यवध्दती असावी असा निर्णय देणे आवश्यक वाटते वरील प्रमाणे एकाच कार्यालयात विसंगती दिसून येणार नाही जेणेकरुन माहिती उपलब्ध करुन देतांना जन माहिती अधिकारी यांना अडचण उत्पन्न होणार नाही. व सदरच्या प्रकरणात ज्या प्रकारची विसंगती दिसून येते तसा प्रसंग एकाच कार्यालयाच्या बाबतीत दिसून येणार नाही.

## आ दे श

1) प्रथम अपीलीय अधिकारी प्रभारी विक्रीकर सह आयुक्त (प्रशा) नागपूर विभाग नागपूर यांनी दि. 19.10.2006 रोजी दिलेला निर्णय हा योग्य असा निष्कर्ष येत असल्याने अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत विभागीय विक्रिकर आयुक्त, विक्रीकर भवन, 7 वा माळा माझगाव मुंबई – 10 यांचेकडे अभिलेखाची समान कार्यपध्दती ठेवण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्याच्या दृष्टीने पोस्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 21.2.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1242-1248

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1005/2007.**

श्री अशोक सुखदयाल शेमला
विभागीय व्यवस्थापक, मध्यचांदा वन प्रकल्प विभाग
बल्लारशाह ता. बल्लारशाह जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दिपक मोरे
जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी
महसुल व वनविभाग, मंत्रालय मुंबई ..... **उत्तरवादी**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.10.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (1) अन्वये सहपत्र ''ब'' मध्ये अपील दाखल केलेले आहे. सदरचे प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल करावयास पाहिजे होते. राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपीलाच्या निर्णयाविरुध्द अधिनियमाच्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल करावयाची तरतुद आहे. परंतु अपीलकर्ता हे स्वतः विभागीय व्यवस्थापक, मध्यचांदा वन प्रकल्प विभाग या पदावर असल्यामुळे त्यांना अधिनियमाच्या तरतुदींची माहिती करुन घेणे आवश्यक वाटत नसावे. आज अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 12.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाची नोटिस दि. 23.1.2008 रोजी निर्गमीत केल्यानंतर त्यांना दिनांक 19.10.2006 व 23.1.2007 अन्वये माहिती प्राप्त झाली आहे त्यामुळे आपल्या कार्यालयात दि. 18.2.2008 रोजीच्या सुनावणीस हजर राहण्याची आवश्यकता भासत नाही असे कळविलेले आहे. वास्तविक राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपील दि. 7.10.2006 रोजी

दाखल केल्यानंतर माहिती त्यांना दिनांक 19.10.2006 व 23.1.2007 ला प्राप्त झाल्या नंतर त्याच वेळेस आयोगाकडील अपील हे मागे घेत आहे वगैरे कळविण्याची आवश्यकता होती. परंतु आयोगाची नोटिस येईपर्यंत त्यांनी कोणत्याही प्रकारची काळजी घेतलेली दिसत नाही. व आजही माहिती मिळाल्यामुळे हजर राहण्याची आवश्यकता भासत नाही अशा प्रकारे आयोगास कळविलेले आहे. यावरुन विभागीय व्यवस्थापक या पदावरील अधिकारी किती आहेत हे दिसून येते. अपीलकर्ता यांनी माहिती प्राप्त झाली आहे व हजर राहण्याची आवश्यकता भासत नाही असे कळविल्याने सदरचे (प्रथम अपील) हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व हजर राहण्याची आवश्यकता नाही असे कळविल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
2) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपर मुख्य सचिव (वने), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई – 32 यांचेकडे माहितीकरीता पोस्टानी पाठविण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 21.2.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1249-1250

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1004/2007.**

श्री ॲड. एम. आर. शेख
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
रेल्वे स्टेशन रोड, भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अवर सचिव (प्रशा–1)
नविन प्रशासकीय भवन, 14 वा मजला, मंत्रालय, मुंबई
2) श्री गफफार शेख
जन माहिती अधिकारी तथा
व्यवस्थापकीय संचालक
मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्या.
डी. डी. बिल्डींग, 2रा मजला, जुने जकात घर,
शहीद भगतसींग मार्ग, मुंबई 400 023. ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.11.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्या. हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.6.2006 रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे कर्ज वाटपाबाबतचा जिल्हानिहाय तपशिल (विदर्भातील जिल्हयाचा) महामंडळ सुरु झाल्यापासून तर चालू वर्षापावेतो (31 मार्च 2006 पावेतो). अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरचा अर्ज हा अंडर सटिफिकेट ऑफ पोस्टींग व्यवस्थापकीय संचालक मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्या. डी. डी. बिल्डींग, 2रा मजला, जुने जकात घर, शहीद भगतसींग मार्ग, मुंबई – 23 या पत्त्यावर पाठविलेला दिसून येतो. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे दि. 28.7.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी अवर सचिव (प्रशा–1) नविन प्रशासकीय भवन यांचेकडे जोडपत्र ''ब'' मध्ये अंडर सटिफिकेट ऑफ पोस्टींग करुन तीच माहिती मागितलेली दिसून येते. परंतु अवर सचिव (प्रशा–1) नविन प्रशासकीय भवन 14 वा मजला, मंत्रालय, मुंबई अशा प्रकारचा अपर्ण पत्ता दिलेला दिसून येतो. असे असले तरी सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 22.9.2006 रोजी सदर अर्जाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की सदर प्रकरणी व्यवस्थापकीय संचालक मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ हे अपीलीय अधिकारी असल्याने आपला मूळ अपील अर्ज पुढील कार्यवाहीसाठी त्यांचेकडे पाठविण्यात येत आहे. तरी याबाबत आपण कृपया त्या कार्यालयाशी परस्पर संपर्क साधावा. त्यानंतर अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्र दाखल केलेले दिसून येत नाही व द्वितीय अपील मात्र दाखल केलेले आहे. सदरच्या प्रकरणात खुलासा करतांना रोजगार विभाग मंत्रालय मुंबई यांचे कडे दिनांक 29.9.2006 रोजीचा अर्ज प्राप्त झाला. दि. 27.9.2006 रोजी वरिष्ठ व्यवस्थापक (प्रकल्प व वसूली) तथा माहिती अधिकारी यांना सर्व तपशीलासह दि. 28.9.2006 पर्यंत सादर करावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. सदरचा मूळ अर्ज महामंडळाच्या कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर दि. 27.9.2006 या पत्रान्वये सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर दिनांक 27.11.2006 रोजी श्री एम. आर. शेख भद्रावती जिल्हा चंद्रपूर यांना तसेच सचिव, रोजगार व स्वयंरोजगार विभाग मंत्रालय यांना पाठविण्यात आली आहे (सोबत पत्राची

प्रत जोडलेली आहे). महामंडळाची सर्व माहिती शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असल्याने सदर माहितीसाठी अर्जदारास महामंडळाच्या वेबसाईटचा पूर्ण पत्ता देवून सदर माहिती वेबसाईटवर उपलब्ध करुन घेण्याबाबत सांगण्यात आले आहे. सदर कालावधीमध्ये श्री के. ए. मेहवी तत्कालीन माहिती अधिकारी वरिष्ठ व्यवस्थापक (प्रकल्प व वसूली) यांची बदली झालेली होती आणि कारभार हस्तांतर करण्याची गडबड चालू होती. त्याच सुमारास श्री आगरकर तत्कालीन सहाय्यक यांची देखील बदली झालेली होती. सहाय्यकाचे दुसरे पद देखील रिक्त होते. कार्यालयामध्ये कर्मचारी अत्यंत कमी होते. तसेच अननुभवी होते आणि कंत्राटी पध्दतीवर नेमणूक केलेले कर्मचारी होते. यामुळे ॲड. एम. आर. शेख यांना शासनाचे पत्रानुसार उत्तर पाठविण्यास विलंब झाला असण्याची शक्यता आहे. अपील अधिका—याकडे अपील केलेले नाही.

3. वरील खुलाशाच्या अनुषंगाने दि. 1.6.2006 चा अर्ज महामंडळाच्या कार्यालयात प्राप्त झाला नाही त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी त्या कालावधीतील महिन्याचे आवक नोंद वहीची छायांकीत प्रत दाखल केली आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांचा अर्ज हा महामंडळाच्या कार्यालयात प्राप्त झालेला नाही असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी अवर सचिव (प्रशा) अशा प्रकारचा जो अर्ज केलेला आहे तो जोडपत्र ब मध्ये केलेला असून सदरच्या अर्जाच्या संदर्भात अंडर सटिफिकेट ऑफ पोस्टींगचे पत्र पाठविलेले आहे. त्यावरील पत्ता हा अपूर्ण आहे. तसेच अवर सचिव म्हणून त्यांना जन माहिती अधिकारी म्हणून जोडपत्र ब मध्ये माहिती मागितलेली दिसून येते तेही अधिनियमाच्या तदतूदीप्रमाणे नाही. राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील दाखल करण्याची तदतूद आहे. मात्र अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले नाही असे खुलाशा वरुन दिसून येते व अपीलकर्ता यांनीसुध्दा प्रथम अपील केल्याची प्रत किंवा निर्णय हा दाखल केलेला नाही. मात्र जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक यांना रोजगार व स्वयंराजगार विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडून दि. 27.9.2006 रोजी अर्ज प्राप्त झाल्या नंतर दि. 27.11.2006 रोजी म्हणजे पुन्हा एक महिना उशिरानी माहिती उपलब्ध करुन

दिलेली दिसते व त्याकरीता अर्थातच विलंबाच्या कारणांचा खुलासा दाखल केलेला आहे. मात्र जी उपलब्ध करुन दिलेली माहिती आहे ती महामंडळाची सर्व माहिती शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असल्याने सदर माहिती साठी अर्जदारास महामंडळाची वेबसाईटचा पूर्ण पत्ता देवून सदर माहिती वेबसाईटवरुन उपलब्ध करुन घेण्याबाबत सांगण्यात आले आहे वास्तविक इलेक्ट्रॉनिक माध्यमातून संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करावी अशी अधिनियमाच्या कलम 4 मध्ये तरतूद आहे ती संकेतस्थळावर उपलब्ध असल्यावरसुध्दा माहितीचा अर्ज दाखल करुन मागणे हे गैर आहे. संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिली तर तो अर्ज करुन मागावयाची व संकेतस्थळावर दिली नाही तर कां दिली नाही म्हणून प्रश्न विचारावयाचे यातील मानसिकता विचार करण्यासारखी आहे व यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असाही निष्कर्ष काढावयास हरकत नाही. वरील सर्व कारणास्तव अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 21.2.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1251-1254

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 109/2007.**

श्री मनोहर शंकरराव कोहळे

रा. आष्टी, गांधी चौक

ता. आष्टी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

1) श्री किरण जाधव

प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी

पंचायत समिती आष्टी

ता. आष्टी जि. वर्धा

2) श्री बी. आर. घारड

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक

पंचायत समिती आष्टी

ता. आष्टी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.12.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये दि. 31.1.1997 पासून 20.11.2006 पर्यंत पंचायत समिती आष्टी येथे अर्ज केले आहेत. जिल्हा परिषद वर्धा येथे 2.5.2006 ते 1.10.2006 या तारखेस अर्ज केले आहे असे नमूद केलेले आहे. परंतु सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये कार्यवाही झाली नाही असे त्यांचे म्हणणे दिसून येते. तसेच आवश्यक असलेल्या माहितीच्या तपशिलामध्ये दि. 1.3.2004 पाटबंधारे विभागाचे प्रमाणपत्र, ग्रामसभेचे प्रमाणपत्र हे सर्व दिल्यानंतर पंचायत समिती आष्टीच्या म्हणण्याप्रमाणे ग्रामपंचायत ग्रामसभेमध्ये मंजुर झालेले प्रस्ताव आम्ही वरिष्ठ अधिका–याकडे अर्ज मंजुरीकरीता पाठवितो परंतु हा अर्ज जवाहर जिवनधारा विहीरी योजनेखाली मंजुरीकरीता त्यावर्षी न पाठविता दुस–या वर्षी सुध्दा पाठविला नाही. कोणत्याच फाईल मध्ये याबाबत नाव दर्ज केलेले नाही. दि. 1.4.2004 अर्जावर पाठविला पाठविला पाहिजे होता परंतु तसे झाले नाही. पाटबंधारे विभागाकडे अर्ज पाठवून विहीर बनवून मिळण्यास विनंती. आवश्यक असलेल्या माहितीचा विषय व स्वरुप जवाहर जिवनधारा विहीरी योजनेखाली विहीर बांधून देण्याकरीता अर्ज दाबून ठेवल्याने सी.इ.ए. राजेंद्र श. तसरे याने दुष्ट भावनेने लालचीपोटी हा अर्ज दाबून ठेवला व माहिती अधिकारी अधिक्षक यांनी त्यांच्या बाबतची माहिती न पाठविता टाळाटाळीचे काम केले. माहितीसंबंधीत कार्यालय व विभाग पंचायत समिती आष्टी लघुपाटबंधारे विभाग आष्टी यांचे मार्फत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा अर्ज मागवितात असे नमुद केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी दि. 12.7.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती आष्टी यांचेकडे जवाहर विहीर योजनेसंदर्भात 31.1.1997 पासून 31.5.2006 पर्यंत केलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. दि. 1.3.2004 ला दिलेल्या अर्जावर दि. 2.12.2004 ठराव क्र. 8 ग्रामसभेचे प्रमाणपत्र मंजूरीचे मागितले ते मी स्वतः नेवून दिले नंतर पाटबंधारे विभागाचे प्रमाणपत्र मागितले ते पण मी अर्जासोबत दिले. हे प्रमाणपत्र मागितले राजेंद्र शं. तसरे, सि.ई.ऐ. हे आहे. यांनी पण माझा अर्ज मंजुरीकरीता पाठविला नाही. याचे काय झाले याचे पण उत्तर दिले नाही.

या सात आठ वर्षाच्या काळात विहीरीची मंजूरी मिळाली नाही. माझे शेत मौजा विश्वनगर हेक्टर आर 1.32 शेत सर्व्हे क्र. 111 खाते नं. 99 असे असून हे अर्ज आजपर्यंत कोणत्या अधिका–याकडे किंवा कर्मचा–याचे नावाने लावले त्याचे नाव हुद्या पदनाम व ते सध्या कोठे आहे त्यांचा पत्ता कळवावा. हे अर्ज आजपर्यंत कोणाजवळ आहे याची तपशिलवार माहितीसह खुलासा करावा. माहितीचा अधिकार कायदा 2005 अंतर्गत माहिती पंधरा दिवसाचे आंत डाकद्वारा पोस्टाने उत्तर द्यावे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 25.7.2006 रोजी अपीलकर्ता यांना 1) अर्ज माहिती अधिकारी यांचे नावे विहित नमुन्यात नाही, 2) अर्ज अपीलीय अधिकारी यांचे नावे पाठविण्यात आला, 3) जवाहर विहीर योजने अंतर्गत ग्रा. पं. कडून ग्रामसभेचे मंजुरीने प्राप्त झालेलेच प्रस्ताव या कार्यालयाकडून सादर करण्यात आले. आपण माहिती मिळण्याबाबत श्री बी. आर. घारड प्र. कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी पं. स. आष्टी यांचेकडे अर्ज करावा. आपणास अपील श्री के. सी. जाधव गट विकास अधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचेकडे करता येईल असे कळविण्यात आलेले दिसते. सदरच्या उत्तराप्रमाणे अपीलकर्ता यांनी दि. 5.8.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी/राज्य माहिती अधिकारी श्री बी. आर. घारड प्रभारी गट विकास अधिकारी यांचेकडे जवाहर राजगार गॅरंटी योजने अंतर्गत शेतात विहीर बनवण्यासाठी खोदकाम करण्याकरीता निधी मंजुरीबाबत दिनांक 31.1.1997 ते 12.7.2006 पर्यंत अर्ज केले. यावर 12.7.2006 संदर्भ पाठविला. यामध्ये 1.4.2004, 31.5.2006, 2.9.2005 उत्तर न देता 1.3.2004 च्या अर्जावर ग्रामपंचायत ठराव क्र. 8 दि. 2.12.2004 नुसार पंचायत समिती आष्टीने ग्रामसभेचे प्रमाणपत्र मंजुर झाल्याचे मागितले ते 5.1.2004 ला दिले परंतु हा प्रस्ताव मंजुरीकरीता प्रकल्प अधिकारी पाटबंधारे विभाग वर्धा यांचेकडे पाठविला नाही म्हणून माझी विहीर मंजूर झाली नाही. स्थानीय आमदाराकडे माझे नाव यादीत पाठविले नाही. हे प्रमाणपत्र श्री राजेंद्र शं. तसरे सी.इ.ए. यांनी मागितले. त्यांनी आपले अधिकाराचा दुरुपयोग करुन त्याने माझे अर्ज वरिष्ठ अधिका–याकडे पाठविला नाही. याची चौकशी व्हावी ही विनंती. सोबत या आधी दिनांक 12.7.06 च्या अर्जाची प्रत जोडली आहे. त्यानुसार मागितलेली माहिती मिळाली नाही ती

देण्यात यावी. आपले पंसआ/अधिक्षक/वासी869/06 कार्यालय पंचायत समिती आष्टी दि. 25.7.2006 –891 मिळाले. सदरचा अर्ज माहिती अधिकारी यांना दि. 14.8.2006 रोजी प्राप्त झाला असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यानुसार दि. 28.8.2006 रोजी विषयांकित माहिती संकलीत करुन आपणास स्वच्छ प्रती पुरविण्यास महा. माहितीचा अधिकार 2005 चे नियम 6 पोट कलम 1, 2 अन्वये पुन्हा कामाचे दिवसाचे मुदत वाढवून देण्याची आपणास याद्वारे विनंती करण्यात येत आहे असे अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी पंचायत समिती आष्टी यांनी कळविल्याचे दिसून येते. त्यानंतर दि. 8.9.2006 रोजी माहिती तयार आहे आपणास ही माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त शुल्क रु. 130/– इतके आहेत. (प्रति झेरॉक्सचा 100 + पोस्ट खर्च 30 = 130) आपणास विनंती करण्यात येते की, हे शुल्क आपण या कार्यालयाकडे प्रदान करावे किंवा मनिऑर्डरनी पाठवावे किंवा कोषागारात भरणा करावा व चलानाची एक प्रत न चुकता पाठवावी आणि माहिती घेवून जावी. ही रक्कम आपण 15 दिवसाचे आंत भरणा करावी. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रु. 130/– चा भरणा केलेला दिसतो व त्याप्रमाणे त्यांना दि. 28.9.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. दरम्यानच्या काळात दि. 6.9.2006 ला अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 13.9.2006 रोजी ठेवण्यात आलेली दिसते. सदरच्या प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये दि. 20.11.2006 रोजी अपीलकर्ता यांचे म्हणणे एकून घेवून त्यांना माहिती पुरविण्यात आली व त्यांनी समाधान व्यक्त केले असे नोटशिट वर नोंद केलेली असून अपीलकर्ता यांनी त्यावर सही दिसून येते. अपीलकर्ता यांनी पुन्हा दि. 19.9.2006 रोजी अर्ज केलेला दिसून येतो. सदरची माहिती दि. 28.9.2006 रोजी उपलब्ध करुन देतांना अपीलकर्ता यांना एकुण 100 प्रति उपलब्ध करुन दिल्या असे माहिती अधिकारी यांनी सांगितले असले तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना 88 प्रतिच मिळाल्या आहेत. सदरच्या माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी ज्या अधिका–याकडे माहिती आहे त्या अधिका–याकडे माहिती उपलब्ध करुन

देण्याकरीता पत्रे दिलेली दिसून येतात. त्यापैकी श्री तसरे सी.इ.ए. पंचायत समिती आष्टी यांनी माहिती अधिकारी यांना दि. 21.7.2006 रोजी ''जवाहर विहिरीची नस्ती श्री गुजर के.आरे. स्थानांतरण झाल्यापासून मी हाताळत होतो परंतु सन 2002–2003 या वर्षामध्ये या कार्यालयास प्राप्त अर्जामध्ये श्री मनोहर शंकर कोहळे यांचा अर्ज नाही त्यामुळे त्यांचे नाव मंजुरीस्तव प्रस्तावित करता आले नाही. त्यानंतर सन 2003–2004 ला विहीरीचे उद्यीष्ट नसल्यामुळे ग्रा. पं. कडून अर्ज मागविण्यात आले नाही. सन 2004–2005 करीता उद्यष्ट प्राप्त झाल्यामुळे प्रत्येक ग्राम पंचायतीकडून शासनाने पाठविलेल्या विहीत प्रपत्रात ग्रामसभेच्या मंजुरीसह प्रस्ताव मागविण्यात आले. त्यानुसार ग्रा. पं. आष्टीने 63 नावाचा प्रस्ताव विहीत प्रपत्रात या कार्यालयात सादर केला. परंतु प्रस्तावामध्ये श्री मनोहर शंकर कोहळे यांचे नावाचा व अर्जाचा समावेश नव्हता त्यामुळे सन 2004–2005 मध्ये सुध्दा त्यांचे नाव मंजुरीस्तव पाठविला आले नाही. एखादा लाभार्थी जर या कार्यालयास अर्ज सादर करीत असेल तर त्यास सदर अर्ज ग्रामसभेतूनच पाठविण्याबाबत सुचीत केल्या जाते. परंतु जबरदस्तीने जर अर्ज दिलेला असेल तर त्या अर्जाचा ग्रामसभेच्या प्रस्तावासह व विहीत प्रपत्रात माहिती भरुन दिली नसल्यामुळे विचार केला जात नाही. सदर्हु लाभार्थीने पुन्हा सन 05–06 करीता या कार्यालयास अर्ज केलेला आहे. परंतु सन 05–06 चे उद्यीष्ट नसल्याने व 06–07 चे उद्यीष्ट अजुनपर्यंत प्राप्त नसल्याने अर्ज तसाच ठेवलेला आहे. परंतु या वर्षी सुध्दा सदर्हु अर्ज हा ग्रामसभेमार्फतच विहीत प्रपत्रात माहितीसह या कार्यालयास पाठवायला हवा. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करता येणार नाही. सद्यस्थितीमध्ये विहीरीच्या नस्ती श्री खरवडे, क.आरे. हे सांभाळतात'' असे कळविलेले दिसून येते व त्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नसल्यामुळे व त्यांचे म्हणण्यानुसार अपूर्ण माहिती मिळालेली असल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे कारणे दिलेली आहेत. याकरीता अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांनी दि. 31.1.97 पासून जे अर्ज केलेले आहेत त्या अर्जाची त्यांना माहिती दिली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु

त्यांना दिलेले सदरच्या अर्जाच्या प्रति त्यांचेकडे उपलब्ध नाहीत व माहिती अधिकारी यांनी दि. 23.8.2006 रोजी श्री तसरे व खरवडे याना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जी पत्रे दिलेले होते त्या पत्राच्या संदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे श्री तसरे यांनी दि. 21.7.2006 रोजी उत्तर दिलेले आहे. अपीलकर्ता यांच्या दि. 5.8.2006 च्या अर्जामध्ये सुध्दा जवाहर विहीरीच्या संदर्भातील माहिती मागितलेली दिसून येते व त्या संदर्भातील माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्पष्टीकरण देतांना गट विकास अधिकारी पंचायत समिती आष्टी यांनी दि. 4.12.2004 रोजी ग्राम विकास अधिकारी ग्रा.पं. आष्टी यांना दिलेल्या पत्रामध्ये उशिरा सादर केलेले प्रस्ताव परत करणेबाबत आपला सन 04–05 चा ठराव क्र. 8 दि. 2.12.2004 च्या संदर्भात जवाहर विहीर कार्यक्रम सन 04–05 करीता विहीरीचे प्रस्ताव दि. 10.4.2004 पर्यंत सादर करण्याबाबत आपणास या कार्यालयाचे पत्र क्र. पं.स.आ. /बाघ/वशि/जविका/क्यु/04 दि. 5.7.2004 अन्वये कळविलेले होते. त्यानंतर आलेले प्रस्ताव स्विकारणार नाही असे त्यात नमुद केलेले आहे. त्यामुळे आपण पाठविलेला श्री कोहळे व सौ. धोंगडी यांचा प्रस्ताव विलंबाने सादर केल्यामुळे परत करण्यात येत आहे असे पत्र दाखविले व सदरच्या पत्राची प्रत ही अपीलकर्ता यांना सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे असे सांगितले. पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्पष्टीकरण देतांना असे सांगितले की जवाहर विहीर लाभार्थी निवड समन्वय समिती सभा या समितीचे अध्यक्ष मा. आमदार असतात सदस्य सभापती पं.स., उपसभापती पं. स., गट विकास अधिकारी, तहसिलदार आष्टी, कृषि अधिकारी, व स्था.अ.सहा. पं.स. आष्टी हे असतात. सदरच्या सभेचे दि. 26.7.2004 रोजी बैठक झालेली दिसून येते. व सदरच्या बैठकीत एकुण 189 लाभार्थींची यादी पुढील कार्यवाहीस्तव संबंधित विभागाला पाठविण्याबाबत अध्यक्ष महोदयांनी सुचना दिल्या असे दिसून येते. त्यावर अध्यक्ष मा. आमदार अमर काळे व इतर सदरस्यांच्या सहया दिसून येतात. यावरुन अपीलकर्ता यांचे अर्जाच्या संदर्भामध्ये जो खुलासा करण्यात आलेला आहे किंवा माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे त्यावरुन वस्तुस्थिती स्पष्ट होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

पुन्हा असे सांगितले की अपीलात मागितलेली माहिती मोघम व नेमकी कोणती माहिती माहिती अधिकारी यांनी दिली नाही याबाबत अर्जावरुन कळत नसल्याने अपीलकर्ता यांना विचारणा केली व त्यांनी मागितलेली माहिती ही माहिती अधिका–याच्या मुळ अर्जामध्ये मागितलेली नव्हती त्यामुळे संपूर्ण धारीका श्री कोहळे यांना दाखविण्यात आल्या व त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यात आली. माहिती अधिकारी यांनी विहीत कालावधीत मागितलेली सर्व माहिती दिलेली आहे व सदर सर्व बाबी श्री मनोहर कोहळे यांना समजावून सांगितल्या व त्यांनी समाधान व्यक्त केले. याबाबत त्यांची स्वाक्षरी घेण्यात आली आहे. सदर अपीलाच्या अनुषंगाने सुनावणीचे पत्र दि. 23.11.2006 अन्वये त्यांच्या पत्त्यावर पाठविले असता श्री मनोहर कोहळे हे नागपूर येथे राहत असल्यामुळे व नागपूर येथील पत्ता नसल्यामुळे त्यांना तामील करता आले नाही. यावरुन असे दिसते की अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपीलकर्ता हे माहिती अपूर्ण मिळाली असे म्हणतात परंतु काय माहिती अपूर्ण मिळाली ते सांगू शकत नाही. मला द्वितीय अपील मेमोमध्ये पाटबंधारे विभागाकडे अर्ज पाठवून विहिर बनवून मिळण्यास विनंती अशी विनंती केलेली आहे ती आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेरील विनंती असल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

1) अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व त्यांची विनंती आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेरील असल्याने सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 21.2.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1255-1261

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1087/2007.**

श्री सुरेन्द्रकुमार प्यारेलालजी मोहबे
रा. अभ्यंकरनगर, मुक्ताबाई शाळेजवळ
तुमसर 441912 ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप आयुक्त प्रादेशिक संचालक (नगर पालिका प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर
2) श्री विजय देशमुख
जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.3.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.11.2006 रोजी मुख्याधिकारी नगर परिषद तुमसर यांचेकडे 1) नगर परिषदेद्वारा मंजुर करण्यात आलेले निवासी ले–आउट प्लान सन 1999 ते सन 2005 पर्यंत ची सत्यप्रत. 2) नगर परिषदे तर्फे मंजुरी देण्यात आलेले निवासी ले–आउटचे डेव्हलपमेंट चार्ज घेण्यात आले होते किंवा नाही. अशी माहिती

मागितलेली असून सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केले आहे. अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 3.1.2007 रोजी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. परंतु दि. 6 जानेवारी 2007 रोजी जिल्हाधिकारी भंडारा करीता अपीलकर्ता यांना असे कळविण्यात आले की केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत अपीलीय अधिकारी तथा आयुक्त प्रादेशिक संचालक (नगर पालिका प्रशासन) नागपूर विभाग नागपूर हे आहे. तरी आपण माहितीचा अधिकार अंतर्गत अपील अर्ज त्यांचे कार्यालयात सादर करावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्या अनुषंगाने दि. 12.1.2007 रोजी अपीलकर्ता यांनी अपीलीय अधिकारी तथा आयुक्त प्रादेशिक संचालक (नगर पालिका प्रशासन) नागपूर विभाग नागपूर यांचेकडे सादर केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 14.2.2007 रोजी देण्यात आला असून अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. प्रतिवादी मुख्याधिकारी तुमसर यांना नोटिस तामिल होवून सुध्दा ते किंवा त्यांचे प्रतिनिधी कोणीच हजर झाले नाहीत. यावरुन सदर कायद्यातील तरतुदीबाबत किती उदासिन आहे या वरुन दिसून येते असा निष्कर्ष प्रथम अपीलीय अधिकारी यांनी काढून आदेश पारीत झाल्यापासून 7 दिवसाचे आंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामुळे दिलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. दरम्यान दि. 17.1.2007 रोजी मुख्याधिकारी नगर परिषद तुमसर यांनी अपीलकर्ता यांना आपणास या कालावधीत मंजुर केलेले लेआउटचे कोणत्या भुखंडाची माहिती पाहिजे ही बाब नमुद केलेली नाही करीता आपणास माहिती सादर करण्यास अडचण होत आहे करीता आपणास पाहिले असलेली माहिती स्पष्ट भुखंडाचे क्रमांक व मंजुर केलेले दिनांकासह कळविल्यास माहिती अविलंब पुरविणे शक्य होईल तसेच न.प. निवडणुक असल्यामुळे आपणास कळविण्यात दिरंगाई झालेली आहे. ही दिरंगाई

व्यक्तिशः करण्यात आलेली नाही. कृपया नोंद घ्यावी व आपण सहकार्य करावे. जेणेकरुन आपणास हवी असलेली माहिती अविलंब पुरविणे सोईचे होईल. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने दि. 25.1.2007 रोजी अपीलकर्ता यांनी मुख्याधिकारी यांना पत्राने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कळविले. तसेच प्रथम अपील दाखल केले याबद्यलची सुध्दा त्यांनी कल्पना दिलेली दिसून येते. परंतु असे असूनही वर नमुद केल्याप्रमाणे प्रथम अपीलाच्या सुनावणीस दि. 13.2.2007 रोजी मुख्याधिकारी हे हजर राहिलेले नाहीत असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनीच त्यांच्या निर्णयात म्हटलेले आहे. त्यानंतर मात्र दि. 28.3.2007 रोजी मुख्याधिकारी नगर परिषद तुमसर यांनी उप आयुक्त अपीलीय अधिकारी नगर पालिका प्रशासन नागपूर यांनी दि. 14.2.1007 ला पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे आपणास आवश्यक सन 1999 ते 2005 पर्यंत नगरपरिषदेचे मंजुर केलेले निवासी भुखंडाच्या नकाशाची प्रत मागणी केलेली आहे. सदरहू प्रकरण शोध कार्य सुरु असून सध्या कार्यालयीन ऑडीट व 31 मार्चचे अतिमहत्वाचे कामे असल्यामुळे नगरपरिषदेकडे उपलब्ध सन 1999 चे सन 2005 पर्यंतचे मंजुर निवासी भुखंडाचे नकाशे दि. 5.4.2007 पर्यंत न चुकता आपणास विनामुल्य पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते व त्यानंतर दि. 4.4.2007 रोजी सन 1999 चे सन 2005 या कालावधीतील एकुण 39 लेआउटच्या सत्यप्रती विनामुल्य पुरविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. मात्र सदरची माहिती अपूर्ण आहे असे पत्र अपीलकर्ता यांनी मुख्याधिकारी तथा माहिती अधिकारी यांना दि. 7.4.2007 रोजी दिले असून त्यात एकुण 35 भुखंडाची माहिती लपविली गेली आहे व त्यात त्यांचा क्रमांक दिली असून सुध्दा त्या वर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

4. वरील वस्तुस्थितीवरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांना अधिनियमाचे कलम 7 (1) प्रमाणे विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच प्रथम अपीलाच्या सुनावणीस सुध्दा माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी हे हजर झालेले नव्हते व त्याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा स्पष्ट असे अभिप्राय दिलेले आहेत. विलंबाच्या करीता जी कारणे दिलेली आहेत ती कारणेसुध्दा विहीत मुदतीच्या

नंतर दिलेली आहेत व त्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी हे कलम 20 प्रमाणे दोषी आढळून येतात. तत्कालीन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांना शास्ती करावयाी झाल्यास कलम 20 (1) च्या परंतूकाप्रमाणे त्यांचे म्हणणे एकुन घेण्याची संधी त्यांना द्यावयास लागेल. त्यांची बदली झालेली असल्यामुळे विद्यमान माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी हे हजर आहेत व त्यामुळे संबंधित माहिती अधिकारी यांना शास्ती करावयाची झाल्यास अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे त्यांना लागू असलेल्या सेवा नियमान्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे संयुक्तिक राहिल. असे असले तरी अपीलकर्ता यांनी दि. 7.4.2007 रोजी ज्या पत्राच्या माध्यमातून अपूर्ण माहिती दिली आहे असे म्हटले आहे त्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी नगरपरिषदेच्या संबंधित कार्यालयात उपलब्ध असलेल्या नस्तीचे निरीक्षण घेणे व त्यांनी नमुद केलेल्या भुखंड क्रमांकापैकी ज्या लेआउटची माहिती उपलब्ध असेल ती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांना तारीख व वेळ कळवून निरीक्षण घेणे सोईचे राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 7.4.2004 च्या पत्राच्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता नगरपरिषद तुमसर या कार्यालयातील संबंधित विभागातील नस्तींच्या निरीक्षण करण्यासाठी माहिती अधिकारी यांना तारीख व वेळ कळवावी व संबंधित नस्तींचे दिलेल्या भुखंडाच्या क्रमांकाच्या संदर्भात निरीक्षण घेवून माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी. व त्याप्रमाणे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 30.11.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.12. 2006 च्या विहीत मुदतीत संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत असून सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त यांनी करुन तसा अहवाल आयोगास हा निर्णय मिळाल्यापासून 3 महिन्यात सादर करावा.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीसाठी पोस्टानी पाठविण्यात यावे

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 22.2.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1262-1266

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1008/2007.**

श्री प्रभाकर सखारामजी लाड
मु.पो.ता. आष्टी (शहीद)
ता. आष्टी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) कु. ममता झा
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद गोंदिया
2) श्री एल. एम. मोहबंशी
जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद गोंदिया ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.8.2006 रोजी सेवानिवृत्ती वेतन मंजूरीकरीता विशेष बाब म्हणून वाढीव सेवेचा लाभ मिळण्याबाबत. दिनांक 27.8.1993 ते 21.8.2006. आवश्यक असलेली माहिती जास्त असल्याने ती वेगळया तक्त्यात सोबत जोडली आहे. सदरची

माहिती ही शासकीय माहिती अधिकारी/राज्य माहिती अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सोबतच्या सहपत्रामध्ये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे. सोबतच्या माहितीचा अधिकार कायद्या अंतर्गत लागणारी आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन.

1) आतापर्यंत माझ्या अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली आहे ?

2) आतापर्यंत कोणत्या कर्मचा—याला मुदत वाढ देण्यात आली आहे काय ? माझ्या माहितीप्रमाणे महाराष्ट्राचे मुख्य सचिव, श्री प्रेमकुमार यांना दोन वेळा मुदत वाढ देण्यात आली आहे. माहिती करिता लोकसत्ता वर्तमानपत्राच्या दि. 31 ऑगष्ट 2005 च्या कात्रणाची सत्य प्रतिलिपीची प्रत सोबत जोडलेली आहे.

3) मग माझ्या बाबत भेदभाव का ?

4) मला सेवेमध्ये मुदत वाढ कधी मिळेल ?

5) शासकिय नियमाप्रमाणे किमान 10 वर्षे नोकरी आवश्यक असतांना व तो माझा हक्क असतांना मुदतवाढ न देता तुम्ही मला 10 वर्षाचे आत निवृत्त का केले ?

6) मला आरक्षण असूनही माझी नोकरी तुम्ही अपूर्ण का केली ? याला जबाबतदा कोण?

7) तुम्हा मला आरक्षण देतांना मला पूर्ण 10 वर्षाची नोकरी का दिली नाही ?

8) सवलत न मिळण्यास जबाबदार कोण?

9) दि.9 डिसेंबर 2004 दि. 5 मार्च 2008 दि. 8 जुन 2005 व दि. 8 जुन 2005 व दि. 27.6.2005 रोजी शासकीय पत्राचे आज्ञापालन का करण्यात आले नाही? वरील पत्रांची अवहेलना कोणी केली? त्याचे नाव काय?

10) माझी चुक नसतांनाही सवलत प्राप्त व्हावी यासाठी काय करणे आहे?

11) नुकसान भरपाई दयावी.

12) लाभाचे पदासाठी कायदयात दुरुस्ती करता येते आणि स्वातंत्र्य संग्राम सैनिकाच्या नामनिर्देशितच्या पेंशनसाठी काहीच करता येत नाही काय? अशी का आपली घटना? असेच का आपले स्वातंत्र्य ?

13) आरक्षण असूनही 10 वर्षाची नोकरी नाही, पेंशन नाही व त्यासाठी मुदत वाढ नाही तर मग जगायचे कसे? व एवढया मोठया कुटुंबाला जगवायचे कसे?

14) ज्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, त्या स्वातंत्र्य संग्राम सैनिकाच्या कुटुंबावरच हा अन्याय का?

माझ्या अर्जावर आतापर्यंत केल्या गेलेल्या कार्यवाहीचा दैनिक प्रगती अहवाल मला देण्यात यावा जसे माझा अर्ज केव्हा व कोणत्या अधिका–याजवळ पोहोचला? त्याच्या जवळ तो किती दिवस पडून राहिला व या काळात त्याने काय कार्यवाही केली? कार्यवाहीमध्ये हलगर्जी करण्यात कोणता कर्मचारी व अधिकारी जबाबदार आहे? व या अधिका–यावर काय कार्यवाही करण्यात आली आहे? कृपया वरील माहिती, माहितीचा अधिकार कायद्याअंतर्गत विशिष्ट मुदतीत माहिती देण्यात यावी हि नम्र विनंती.

3. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 19.9.2006 रोजी ''आपणास नेमकी कोणत्या प्रयोजाना विरुध्द माहिती हवी आहे याबाबत स्वयंस्पष्ट केलेले नाही. तसेच आपण जिल्हापरिषदेमध्ये संगित शिक्षक म्हणून सेवा केलेली असल्याने आपणास स्वतः सदर माहितीबाबत ज्ञात आहात. आपण सदर बाबीकरीता खर्च कळवावा तो मी देण्यास तयार आहे असे नमुद केले आहे. तसेच मुख्य कार्यपालन अधिकारी शालेय माहिती अधिकारी नाही तर विषयांकित सदर बाबी संबंधात आपले सविस्तर काही म्हणणे असल्यास आपण या कार्यालयात येवून मला प्रत्यक्ष दि. 25.9.2006 ला या कार्यालयात यावे'' असे शासकीय माहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद गोंदिया यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 26.9.2006 रोजी पुन्हा अर्ज सादर केलेला दिसून येतो. विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.9.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.11.2006 ला दिलेला दिसून येतो. ''आपण उपस्थित केलेले मुद्दे व त्या अनुषंगाने वेळोवेळी कार्यवाही या विभागाने केलेली आहे तद्वतच आपण सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालय खंडपीठ

नागपूर येथे रिट याचिका क्रमांक 2746/05 अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ट केलेले असून सद्यस्थितीत प्रकरण अंतिम निर्णयास्तव प्रलंबित आहे. सबब आपले माहितीकरीता कळविण्यात येत आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. तसेच संदर्भिय विषयांकित बाबी संबंधाने आपणास यापूर्वीच पत्र क्र. 2969 अन्वये दि. 3.10.06 ला या कार्यालयातून माहिती पुरविण्यात आलेली आहे असेसुध्दा नमुद केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये पुन्हा आवश्यक असलेली माहिती जास्त असल्यामुळे व त्याप्रमाणे त्याचे प्रयोजनही जास्त असल्याने ती वेगळया तक्त्यात सोबत जोडली आहे असे नमुद केलेले आहे. जोडपत्र 'क' मध्ये विशिष्ट मुदतीत माहिती दिली नाही. मागितलेली माहिती कोर्टाशी संबंधित आहे असे सांगुन माहिती देण्यास टाळले. 250 किलोमिटर लांब अंतरावरुन मला स्वखर्चाने दि. 24.9.2006 ला शिक्षणाधिकारी कार्यालय गोंदिया येथे बोलाविले. विनाकारण त्रास दिला तेही विशिष्ट मुदतीनंतर मला बोलावले. मला वाटले माझ्या सेवेमध्ये मुदतवाढ देण्यासाठी बोलावले असेल. पण सर्व काही व्यर्थ जाण्या–येण्याचा खुप खर्च आला मला विनाकारण खर्चात उतरविले. मी दि. 22.8.2006 ला माहितीच्या कायद्या अंतर्गत अर्ज केला आहे. यापुर्वी मी माहिती मागण्याचा कोणताही अर्ज संबंधित विभागाला केला नाही. मग मा. माहिती अधिकारी आपल्या दि. 3.10.2006 च्या पत्रामध्ये असे का म्हणतात की आपण उपस्थित केलेला मुद्दे व त्या अनुषंगाने वेळोवेळी कार्यवाही या विभागाने केलेली आहे. असे कळवून माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे. मा. महामहीम राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम महोदयांच्या दि. 9 डिसेंबर 2004 च्या आदेशपत्राप्रमाणे मला शासकीय सेवेमध्ये मुदत वाढ देण्यात येत असल्याची आनंदाची माहिती मला विशिष्ट मुदतीत देण्यात यावी. मा. महामहीम राष्ट्रपती महोदयांच्या आदेशपत्राची प्रमाणित प्रत सोबत जोडलेली आहे. माझ्या अर्जावर आतापर्यंत केल्या गेलेल्या कार्यवाहीचा दैनिक प्रगती अहवाल व दस्तऐवज मला देण्यात यावा, जसे माझा अर्ज केव्हा व कोणत्या अधिका–याजवळ पोहचला ? त्याच्या जवळ तो किती दिवस पडुन राहिला व या काळात त्याने काय कार्यवाही केली? कार्यवाही मध्ये हलगर्जीपणा करण्यात कोणता कर्मचारी व अधिकारी

जबाबदार आहे? व या अधिका–यावर काय कार्यवाही करण्यात आली आहे? कृपया वरील माहिती माहितीचा अधिकार कायदया अंतर्गत विशिष्ट मुदतीत मला देण्यात यावी. द्वितीय अपील मेमोसोबत मात्र 9 डिसेंबर 2004 च्या आदेशाप्रमाणे सेवेत मुदत वाढ देण्यात येत असल्याचा मा. महामहीम राष्ट्रपती महोदयांच्या आदेशपत्राची प्रमाणित प्रत सोबत जोडलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 19.9.2006 च्या उत्तराच्या संदर्भात विचार केल्यास अर्जाचे अवलोकन करावे लागते. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जात जी माहिती मागितलेली आहे व त्या अर्जामध्ये सेवानिवृत्ती वेतन मंजुरीकरीता विशेष बाब म्हणून वाढीव सेवेचा लाभ मिळण्याबाबत अशा प्रकारचे मोघम दिलेले आहे. त्याचप्रमाणे एकुण 14 प्रश्न विचारलेले आहे व या 14 प्रश्नांमध्ये जन माहिती अधिकारी यांचे त्यांच्या मुदतवाढीच्या संदर्भामध्ये पुन्हा शासकीय नियमाप्रमाणे 10 वर्षे नोकरी आवश्यक असतांना तो माझा हक्क असतांना मुदत वाढ न देता तुम्ही मला 10 वर्षाचे आत निवृत्त का केले. मला आरक्षण असतांनाही माझी नोकरी अपूर्ण का केली. मला सेवेमध्ये मुदत वाढ कधी मिळेल वगैरे प्रश्नांची उत्तरे ही जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षा केलेली आहे व त्यामुळेच कदाचीत कोणत्या प्रश्नाविरुध्द माहिती हवी आहे याबद्यल अर्जामध्ये विचारणा केलेली दिसून येते. व त्याकरीता द्वितीय अपील मेमोमध्ये नमुद केल्याप्रमाणेच दि. 24.9.2006 रोजी अपीलकर्ता यांना कार्यालयात बोलाविलेले दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) प्रमाणे ''माहिती'' या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. त्या व्याख्येमध्ये ''माहिती'' याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ईमेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके, आदेश इत्यादी यांचा समावेश होतो. व ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहाणी करणे व दस्तऐवज किंवा अभिलेखाच्या टिपण्या किंवा उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे व ''अभिलेख'' यात कोणताही दस्तऐवज, हस्तलिखित फाईल इत्यादी नमुद केलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या सेवानिवृत्तीच्या संदर्भात,

मुदत वाढीच्या संदर्भात जे प्रश्न विचारलेले आहे ते प्रश्न वरील व्याख्येच्या संदर्भात त्यांचा अंतर्भाव होत नाही. साधा अर्थ घ्यावयाचा झाल्यास दस्तऐवज, अभिलेख यांच्या छायांकित प्रति उपलब्ध होतात. मुदत वाढ किंवा निवृत्ती वेतन हे का मिळाले नाही हा निर्णय प्रक्रियेचा भाग आहे व त्या त्या अधिनियमाप्रमाणे किंवा नियमाप्रमाणे त्या त्या अधिका–यानी सदरच्या बाबत निर्णय घेण्याचे अधिकार आहेत. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या सदरच्या प्रश्नांची उत्तरे माहितीच्या अधिकाराच्या संदर्भात मिळू शकत नाही व त्याबाबतचे आदेश देणे सुध्दा हे राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षेत येत नाही. मुदत वाढीच्या संदर्भामध्ये किंवा वेतन वाढीच्या संदर्भामध्ये केलेल्या अर्जावर कार्यवाही काय झाली याबाबत मात्र माहितीच्या अधिकारात कार्यवाहीची माहिती देता येवू शकते परंतु त्याबाबत त्यांना पूर्वी सर्व माहिती दिलेली दिसते व त्यांचेकडे स्वतः माहिती आहे असेच दिसून आले. त्यांचे अर्ज ज्या ज्या अधिका–याकडे पाठविले आहे त्या त्या अधिका–याचे पत्र त्यांनी सुनावणीच्या वेळेस दाखविलेले आहे. त्यामुळे त्यांच्या अर्जावर कार्यवाही काय सुरु आहे किंवा नाही ही माहिती त्यांच्या जवळ दिसून येते. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांचे प्रकरण मा. विद्यमान उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. 2746/05 अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ट केलेले असून सद्यस्थितीत प्रकरण अंतिम निर्णयास्तव प्रलंबित आहे असेही नमुद केलेले दिसून येते व तेही अपीलकर्ता यांनी मान्य केले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना दि. 3.10.2006 रोजी जे उत्तर दिले आहे ते त्यांच्या अर्जाप्रमाणे दिले असून ते योग्य आहे असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु त्यांची अंतिम मुदतवाढीच्या/निवृत्तीवेतनाच्या वाढीचा जी अपेक्षा त्यांना आहे ती मात्र राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षेतील बाहेर असल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचा निर्णय या अपीलाच्या माध्यमातून देता येत नाही. दिनांक 3.10.06 च्या उत्तरामध्ये सेवा निवृत्ती वेतन मिळणेसाठी मुदत वाढ देण्याबाबत महा. नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मध्ये तरतुदी नसल्याने या संदर्भात आपणास या कार्यालयाचे पत्र क्र. 3435/05 दि.

30.6.2005 अन्वये तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जल संधारण विभाग मंत्रालय मुंबई चे कक्ष अधिकारी यांचे पत्र क्रमांक सेनिवे–4102/प्रक 36/आस्था 11 दि. 23 मार्च 06 अन्वये कळविण्यात आलेले आहे. आपण उपस्थित केलेले मुद्दे व त्या अनुषंगाने वेळोवेळी कार्यवाही या विभागाने केलेली आहे. आपण सदर प्रकरणी मा. विद्यमान उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. 2746/05 अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ट केलेले असून सद्यस्थितीत प्रकरण अंतिम निर्णयास्तव प्रलंबित आहे असे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 21.2.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.